Language Code : **11**

# JSS-24-II

प्रश्न-पत्र-II / PAPER-II

मराठी भाषा परिशिष्ट

Marathi Language Supplement

भाग-IV & V / PART-IV & V

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code

**I**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **I**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :

   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)

   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **I**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :

   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)

   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ______________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ______________________

: शब्दों में / in words ______________________

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ______________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ______________ निरीक्षक के हस्ताक्षर : ______________
Candidate's Signature : Invigilator's Signature :

Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ______________________

Language Code : **11**

ही पुस्तिका **20** पृष्ठ आहे.

# JSS-24-II

**प्रश्नपत्रिका-II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**I**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV ( भाषा I ) **किंवा** भाग V ( भाषा II ) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड I** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________________

: शब्दांमध्ये : ______________________________

परीक्षाकेंद्र : ______________________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______________________________

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

→

**भाग–IV**

**भाषा–I**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

कंपासपेटी आज खूप खूश होती. तिला छान नटवलं होतं ना मुग्धाने. महत्त्वाचं म्हणजे तिनं तिच्यातला सगळा निरुपयोगी कागदांचा पसारा काढून टाकला होता. नवीन पेनं, नुकतंच टोक काढलेली पेन्सिल, वेष्टनात लपेटलेला नवा खोडरबर, नवा कोरा धारदार शार्पनर अशा सगळ्या नवनव्या वस्तूंनी सजलेली कंपासपेटी आपणच परतपरत आपलं रुपडं निरखत होती. 'मुग्धा काय नि कित्ती वस्तूंची अडगळ करते नेहमी माझ्यामध्ये' असं तिला सारखं वाटत होतं. काय काय भरून ठेवते ती 'कसले कसले स्टिकर्स' पेन्सिलचा कचरा, कागदाचे तुकडे आणि बरंच काही, पण उद्या मुग्धाची दहावीची परीक्षा सुरू होतेय त्यामुळे परीक्षेच्या आधी तिनं कंपासपेटीचं रूपच पालटून टाकलं होतं. आज तिला स्वच्छ नीटनेटकी केली होती.

ती स्वत:चं रूप निरखत असतानाच मुग्धानं तिला सॅकमध्ये ठेवलं. सॅकमध्ये गेल्यावर तिला एकदम प्रशस्त बंगल्यामध्येच गेल्यासारखं वाटलं. नेहमी पुस्तकं, वह्या, रंगपेटी, पट्टी, कागदाच्या गुंडाळ्या यांच्या बरोबर राहायचं म्हणजे तिचा जीव घुसमटून जात होता अगदी. पण कंपासपेटीला जास्त काळजी वाटत होती ती मुग्धाच्या आईची. दहावीची परीक्षा मुग्धाची आणि तिच्यापेक्षा काळजी आईला. जणूकाही आईचीच परीक्षा होती. आई तर सतत अस्वस्थ होती. माझ्या मनूला परीक्षा द्यायला जमेल ना! दहावीची परीक्षा कठीण तर असणार नाही. असे एक ना अनेक प्रश्न आईच्या मनात येत होते आणि आईला त्यामुळे खूप ताण आला होता. आईला ताण आला तसा तो मुग्धालाही आला होता. तिनं तसं आपली मैत्रीण राहीला बोलूनही दाखवलं. त्यावर राहीनं तिला एक सुंदर गोष्ट सांगितली. ती म्हणाली, ''आपण मागे सहलीला गेलो तेव्हा एका गावात बसमधून उतरलो, आठवतंय ना तुला?''

''हो तर आठवतं ना.''

''मग आपण चालतचालत एका टेकडीच्या दिशेने गेलो. टेकडी चढताना जरा अवघड गेलं, पण टेकडीवर पोहोचल्यावर पुन्हा एक सुंदर रस्ता दिसू लागला आणि आपला पुढचा प्रवास सुरू झाला.''

''हो..'' राही पुढे म्हणाली, ''मला तरी दहावीची परीक्षा तशीच वाटते. खरं तर ती इतर परीक्षांसारखीच असते. पण थोडीशी वेगळी. म्हणजे ती पूर्ण वर्षांच्या अभ्यासक्रमावर असते. ती दुसऱ्या शाळेत जाऊन द्यावी लागते. परीक्षक वेगळे असतात, पण ती चांगल्या प्रकारे दिली, व्यवस्थित उत्तीर्ण झालो तर त्या टेकडीवरून जसा आपल्याला सुंदर रस्ता दिसला तसा दिसू शकतो.'' कंपासपेटी जरी सहलीला गेली नव्हती तरी राही जे सांगत होती ते चित्र तिच्या डोळ्यासमोर स्पष्टपणे उभं राहिलं. कंपासपेटी त्यावर विचार करत असतानाच मुग्धा म्हणाली, ''हो गं, हे तर माझ्या लक्षातच आलं नव्हतं. अजून एक सुचतंय मला सांगू का?'' राहीनं होकार दिल्यावर मुग्धा म्हणाली, ''आपल्या वर्गातले काहीजण त्या टेकडीवर स्वत:हून थांबले, ते पुढे आलेच नाहीत. त्यांनी तिथे साफसफाई केली. झाडं लावली. झाडावर चढायला शिकले. काही थोडावेळसाठी थांबले तर काहींनी पुढे जाताना मार्ग बदलले. तसंच असतं ना दहावीच्या परीक्षेचं.'' यावर टाळी देत दोघीही हसल्या होत्या आणि तेव्हापासून मुग्धाच्या मनावरचा दहावीच्या परीक्षेचा ताण निघून गेला.

**91.** 'दहावी परीक्षा' अधोरेखित शब्द ओळखा.

(1) गुण विशेषण (2) गणनावाचक संख्याविशेषण

(3) क्रमवाचक संख्याविशेषण (4) अव्ययसाधित विशेषण

**92.** कंपासपेटीला कोणाबद्दल जास्त काळजी वाटत होती ?

(1) आई (2) मुग्धा (3) राही (4) दहावीची परीक्षा

**93.** 'निरखणे' या शब्दाचा समानार्थी आशय नसलेला पर्याय शोधा.

(1) पारखणे (2) न्याहाळणे (3) बारकाईने पाहणे (4) निरपेक्ष

**94.** सजवलेल्या कंपासपेटीत नसलेला घटक कोणता ?

(1) कागदाचे तुकडे (2) धारधर शार्पनर

(3) टोक काढलेली पेन्सिल (4) खोड रबर

**95.** कोणाच्या सान्निध्यात कंपासपेटीचा जीव गुदमरत असे ? चुकीचा पर्याय शोधा.

(1) पुस्तक (2) रंगपेटी (3) सॅक (4) कागदाच्या गुंडाळ्या

**96.** दहावीच्या परीक्षेबाबत राहीने कोणती गोष्ट सांगितली नव्हती ?

(1) ती पूर्णवर्षाच्या अभ्यासक्रमावर असते (2) ती आपल्याच शाळेत द्यावी लागते

(3) परीक्षक वेगळे असतात (4) ती इतर परीक्षांसारखीच असते

**97.** मुग्धाच्या मनातील दडपण या कारणास्तव नाहीसं झालं.

(1) राहीशी चर्चा केल्यामुळे (2) डोंगरावर चढल्यामुळे

(3) व्यवस्थित कंपासपेटी लावल्यामुळे (4) नीटनेटकी स्वच्छता केल्यामुळे

**98.** एकवचन-अनेकवचनी शब्दजोड्यांपैकी चुकीची जोडी शोधा.

(1) पेटी-पेट्या (2) टेकडी-टेकड्या (3) पेन्सिल-पेन्सिल्या (4) वही-वह्या

**99.** पुढीलपैकी विशेषनाम असलेला पर्याय शोधा.

(1) टेकडी (2) रस्ता (3) पसारा (4) राही

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

झुळझुळ वाहे नदीचे पाणी।
आलंय कुठून ? सांगेल का कुणी ?
डोंगरदऱ्यात झालाय उगम।
खळाळत वाहते प्रदेश असता दुर्गम।
वाटेत भेटती गावे शेजारी।
गरज भागवी त्यांची सारी।
रानावनात झाडे अन् वेली।
तृषार्तांना तीच असे वाली।
का होते तिची दुर्दशा पुढे।
गृहीत धरती बिचारीला सगळे।
केरकचरा आणि सांडपाणी।
जलप्रदूषण हे केले तुम्ही–आम्ही।
जीवनदायिनी ही आपली।
अवकळा सारी तिला आणली।
वेळीच मानवा हो जागा।
ठेव शुद्ध रे तू सरिता।

**100.** कवीला कोणत्या गोष्टीचा उलगडा होत नाहीये ?

(1) अवकळा का आली
(2) प्रदूषण कसे झाले
(3) कोणी गृहीत धरले
(4) नदीचे पाणी कुठून आले

**101.** 'आपण नदीला अवकळा आणली' असे कवीला का वाटते ? त्याला नेमके काय सुचवायचे आहे ?

(1) दुर्दशा केली
(2) शुद्धिकरण केले
(3) जीवनदायिनी ठरवले
(4) तृषार्त केले

**102.** 'नदी' शब्दाचा पर्यायवाची शब्द शोधा.

(1) सरकी
(2) सरिता
(3) सरासरी
(4) भागवी

**103.** दुर्गम प्रदेशात तिचा प्रवाह नेमका कसा असतो ?

(1) संथ वाहणारा
(2) वेगवान
(3) तुंबलेला
(4) खळाळणारा

**104.** कवी नदीचा 'वाली' असा उल्लेख कोणासाठी करतो ?

(1) डोंगरदऱ्यांसाठी (2) वृक्षवेलींसाठी (3) तहानलेल्यांसाठी (4) अवकळा आणणाऱ्यांसाठी

**105.** नदी आपल्या प्रवासात कोणाच्या गरजा भागवते ?

(1) गावांच्या (2) दऱ्यांच्या (3) सांडपाण्याच्या (4) जलप्रदूषणाच्या

**106.** चाचण्या आणि मूल्यमापनाचा शिक्षक, विद्यार्थी आणि साधनसामग्रीवर पडणारा प्रभाव म्हणजे __________.

(1) साधनसामग्री प्रभाव (Corpus effect) (2) वॉशबॅक प्रभाव (Washback effect)

(3) वर्ग प्रभाव (Classroom effect) (4) प्रबलीकरण (Reinforcement)

**107.** शाळांनी मिश्र द्वैभाषिकत्त्वाचे अनुसरण केले पाहिजे कारण ते __________.

(1) मुलाची भाषा आणि संस्कृतीचा आदर करते.

(2) द्वितीय भाषा म्हणून इंग्रजी शिकविण्यास प्राधान्य देते.

(3) मुलाच्या भाषेला उत्तेजन देते संस्कृतीला नाही.

(4) प्रथम भाषेच्या विकासात अडथळा आणते.

**108.** स्वरशैली, सूर, भर देणे आणि नाद या भाषाशास्त्रीय कार्यांना __________ म्हणतात.

(1) कविता (Poetry) (2) छंद (Prosody)

(3) स्वन (Phonetic) (4) व्यावहारिक (Pragmatics)

**109.** भारतातील भाषा या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य नाही ?

(1) भारतीय राज्य घटनेप्रमाणे इंग्रजी ही सहयोगी कार्यालयीन भाषा आहे.

(2) भारतीय राज्य घटनेच्या आठव्या अनुसूची प्रमाणे 22 भाषा आहेत.

(3) संस्कृत ही आधुनिक भारतीय भाषा आहे.

(4) हिंदी ही भारतीय उपमहाद्वीपाची संपर्क भाषा आहे.

**110.** भाषा वर्गातील विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनात गटागटातून दिलेल्या विषयावर एक जाहिरात सादर करतात. या पद्धतीने भाषा शिकणे म्हणजे ___________.

(1) सहभागी शिक्षण (2) स्पर्धा आणि वैमनस्य

(3) भाषा खेळ (4) मार्गदर्शन आणि समुपदेशन

**111.** शिक्षिका विद्यार्थ्यांना रेस्टॉरेंटमधील शब्दावलींची ओळख होण्यासाठी एक नियत कार्य देते. या उपक्रमाचे कोणते उद्दिष्ट असायला पाहिजे ?

(1) विद्यार्थ्यांना शाब्दिक (Lexical) नमुन्यांची ओोळख करून देणे.

(2) त्यांना व्याकरणिक नमुन्यांचा परिचय करून देणे.

(3) एका प्रवासस्थाना विषयीचा मजकूर सांगणे.

(4) कल्पक चिंतन विकसित करणे.

**112.** पुढीलपैकी कोणती शिक्षण विचारधारा असे मानते की, भाषा मग ती मौखिक असो किंवा अ–मौखिक (Non-verbal) सवय लावण्याच्या प्रक्रियेतून घडते ?

(1) व्यवहारवादी (Functionalist)

(2) वर्तनवादी (Behaviourist)

(3) ज्ञानात्मक (Cognitivist)

(4) अन्योन्यक्रियावादी (Interactionalist)

**113.** कथेचे स्थान आणि काळ/वेळ यांना __________ म्हणतात.

(1) आशय (Theme)

(2) नेपथ्य (Setting)

(3) संविधानक (Plot)

(4) उत्कर्षबिंदू (Climax)

**114.** भाषा वर्गात शिक्षिका विद्यार्थी गटाला सांगते, तुमच्यापैकी एकेकानं क्रेता, घर विकणारा, भवन स्वामी आणि भाडेकरू भूमिका करायच्या. इतर मुलांना त्यांचा अभिनय पाहणे आणि त्यांचे संभाषण ऐकण्यास सांगते. या उपक्रमाला काय म्हणता येईल ?

(1) भूमिकाभिनय

(2) नाटक

(3) अभिनय वर्ग

(4) मार्गदर्शन

**115.** एक भाषा शिक्षिका पाचवी इयत्तेच्या वर्गातील मुलांसाठी दैनंदिन उपयोगाच्या वस्तू, जसे वर्तमानपत्र, मेनू कार्ड आणि ट्रेनची तिकिटे शिकविण्यासाठी आणते. मुलांनी शिकावे यासाठी ती काय करते ?

(1) शिक्षण अधिक वास्तव आणि उपयोगी व्हावे यासाठी ती अधिकृत सामग्रीचा वापर करते.

(2) ती विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकण्यासाठी मदत करते.

(3) विद्यार्थ्यांनी जीवनसदृष्य परिस्थितीत इंग्रजी शिकावे असे तिला वाटते.

(4) ती विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करते.

**116.** ऐकण्याचा सराव यासाठीचे नियोजन करताना पुढीलपैकी कोणती बाब महत्वाची नाही ?

(1) ध्वनिमुद्रण थांबवणे (Posing the recording)

(2) उच्चारणाचा वेग

(3) बोलणाऱ्याचे लिंग

(4) बोलणाऱ्यांची संख्या

**117.** भारतातील बहुभाषिकतेचा हेतू शिक्षकांना __________ समजावे हा आहे.

(1) संभाषण होणे आणि सामाजिक बळकटी असणे

(2) अल्पसंख्यांक भाषांना प्रभावशाली भाषेत बांधणे

(3) वैविध्यतापूर्ण समाजात 'एक भाषा' धोरणाची रचना करणे

(4) भाषा, ओळख आणि संस्कृती हे स्वतंत्र घटक आहेत

**118.** पुढीलपैकी कोणते भाषिक कौशल्य ग्रहण कौशल्य म्हणून ओळखले जाते ?

(1) ऐकणे व बोलणे

(2) बोलणे व लिहिणे

(3) वाचणे व लिहिणे

(4) ऐकणे व लिहिणे

**119.** ऐकण्याच्या प्रक्रियेत याचा समावेश असतो __________.

(1) ध्वनी ऐकणे, ध्वनींचा जसाचा तसा अर्थ लावणे

(2) आशयाचा अनुमान लावणे

(3) विषयाच्या पूर्व ज्ञानाचा वापर करणे

(4) ध्वनी ओळखणे आणि त्यातून अर्थ काढणे

**120.** रकाना **A** मध्ये दिलेल्या अध्यापन पद्धतीशी सुसंगत रकाना **B** मधील अध्यापन पद्धतीचे ज्ञान किंवा संबंधित उपक्रमाची जोडी जुळवा.

| | **A** | | **B** |
|---|---|---|---|
| (a) | संभाषणात्मक भाषा शिक्षण | (i) | सामाजिक मान्यता असलेली आणि योग्य संदर्भ असलेली भाषा |
| (b) | थेट पद्धती | (ii) | मूक वाचन |
| (c) | व्याकरण भाषांतर | (iii) | लेखी साहित्यिक मजकूर |
| (d) | वेस्टची नवी पद्धती (West's New Method) | (iv) | आगमनात्मक (inductively) व्याकरण शिक्षण |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **( प्रश्न क्र. 121** ते **150 )** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

**भाग–V**

**भाषा–II**

**मराठी**

| |
|---|
| **महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत. |

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

दिवाळीची चाहूल लागताक्षणी स्त्री–मन आनंदाने नाचू लागते. बदलत्या काळाबरोबरच स्त्रीजीवनाचे संदर्भही बदलले आहेत. तिच्या कार्यक्षेत्राचा परीघ दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. म्हणूनच दिवाळीच्या सुट्टीत चार–दिवस निवांत निसर्गाच्या सानिध्यात घालविण्याची स्वप्ने ती सहज बघते; पण ज्या काळात स्त्री फक्त मर्यादित क्षेत्रात जगत होती, तेव्हा तिची मानसिकता कशी होती ? आपल्या सणा–वारांविषयी तिच्या काय भावना होत्या. या सर्वांचेच उत्तर आपल्याला लोकसाहित्यातून मिळते. लोकगीतातून स्त्री–मनाचे हे हुंकार जागोजागी आढळतात. दिवाळीची आतुरतेने वाट बघणाऱ्या या स्त्रीने तिच्या मनाची असंख्य स्पंदने ओवीबद्ध करून ठेवली आहेत. या ओवीगीतांमधून भारतीय संस्कृतीचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते. किंबहुना, स्त्रियांची ओवीगीते तर भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. आपले सण, उत्सव, विधी, परंपरा या सर्वांचेच प्रतिबिंब या गीतांमध्ये पडले आहे. तना–मनामध्ये चैतन्य निर्माण करणारी दिवाळी तर भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

दसरा दूर गेला, दिवाळी इसा दिशी असं म्हणत म्हणत या ओव्यांमधली गृहिणी कामाला लागते. सणांमध्ये सण दिवाळी सण मोठा हाच भाव सर्वत्र भरून राहतो, दिवाळीच्या स्वागताची तयारी घराघरांत होते. शेतकऱ्याच्या घरात धन–धान्य आलेलं असतं. गाई–गुरांचं कौतुक चाललेलं असतं. 'दिवायीना दिन, बाई खेतीना पसारा,' असं म्हणत घरात लगबग सुरू असते. अंगणात शेणाचा सडा शिंपला जातो, दारी रांगोळी काढली जाते. सख्या शेजारणी अंगणात जमा होतात. या सर्व वातावरणाचा देखावा या ओवीतूनही दृष्टीस पडतो.

शेजी घाली सडा माझ्या सड्याला भिडून

बंधुराज माझा आला रांगोळी मोडून

अशा सुबक रांगोळीभोवती पणत्यांची आरास केली जाते. सगळीकडे मंगलमय वातावरण निर्माण होते. सोन्या–चांदीने, माणिक–मोत्याने लक्ष्मीची पूजा मांडली जाते.

'लक्षुमी गं बाई आली, आली तशी जाऊ नको.'

घरादाराला गं माझ्या अंतर देऊ नको.

असे म्हणत घरातील गृहिणी आपल्या घराचे सौख्य अबाधित राहावे, म्हणून प्रार्थना करते. लक्ष्मीसोबतच घरातील, दूध–दुभत्या जनावरांना 'मानाचे स्थान' असते. त्यांना औक्षण केले जाते. चार घास कौतुकाने भरविले जातात. 'दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी' म्हणून हा सोहळा पार पाडला जातो. पूर्वी सासरी जाणाऱ्या लेकी–बाळीसोबत गोधन देण्याची प्रथा होती.

रुक्मिणीलादेखील गाई आंदण दिल्याचे उल्लेख लोकगीतांतून आढळतात. या संदर्भात या ओवीतील माहेरवाशीणीचे मागणे पाहण्यासारखे आहे.

दिवाळी दसऱ्याची चोळी फाटून झाली चिंधी

नटव्या बंधुजीने मला औताला दिले नंदी

भारतीय संस्कृतीही कृषिसंस्कृती असल्याने सर्व जनजीवन या पशुधनाशी निगडित आहे. म्हणून सासुरवाशीणीला माहेरकडून या चोळी–बांगडीपेक्षा या पशुधनाची अधिक अपेक्षा असायची, कारण त्यामुळेच तिच्या जीवनात समृद्धी नांदायची.

लोकगीतातून स्त्रीमनाचे विविध पदर उलगडत जातात. प्रामुख्याने स्त्रियांची ही गीते म्हणजे दळण–कांडण करीत असताना प्रसवलेली असतात, त्यामुळे स्त्रीच्या भावविश्वाची अदीमताच यातून जाणवते. माहेर म्हणजे स्त्रीच्या 'मर्मबंधातील ठेव' अन् दिवाळी म्हणजे या सुखाची पर्वणीच! तिच्या मनात दिवाळीविषयक अधिक उत्कंठा असते.

**121.** 'दिवायीना दिन बाई खेतीना पसारा' यातील 'खेतीना पसारा' यातून काय सूचित केले आहे?

(1) घरात धनधान्य आलेले आहे
(2) गाई–गुरांचं कौतुक चाललेलं आहे
(3) रांगोळी काढलेली आहे
(4) अंगणात सडा शिंपलेला आहे

**122.** लेखिकेच्या मते सासुरवाशिणीला माहेरकडून कशाची अधिक अपेक्षा असते?

(1) चोळीबांगडी (2) पशुधन (3) नंदी (4) औत

**123.** 'लक्ष्मीची पूजा' यातील 'लक्ष्मी' हे काय आहे?

(1) सामान्यनाम (2) सर्वनाम (3) विशेषनाम (4) समुदायवाचक नाम

**124.** 'दिवाळी सण मोठा' यातील 'मोठा' हे काय आहे?

(1) कर्ता (2) विशेषण (3) कर्म (4) क्रियापद

**125.** प्रस्तुत उताऱ्यात शेतीची वस्तू म्हणून कोणता शब्द आलेला आहे?

(1) औत (2) नंदी (3) गाई (4) माणिक

**126.** स्त्रीच्या मर्मबंधातील ठेव कोणती असते?

(1) दिवाळी (2) भाऊराया (3) रांगोळी (4) माहेर

**127.** उताऱ्यातील लोकगीतातून भाऊरायाचे आगमन कसे होते ?

(1) रांगोळी मोडून (2) सडा घालून (3) रांगोळी काढून (4) दिवा लावून

**128.** स्त्रियांच्या ओवीगीतांतून पुढीलपैकी काय आढळत नाही ?

(1) स्त्रियांची मानसिकता

(2) सण-वार

(3) स्त्री मनाचे सुख दु:ख

(4) संस्कृति विरोध

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

पौष हा संक्रमणाचा महिना. थंडीचा कडाका यातलाच. दिवस मोठे होण्याची निशाणी याच दिवसांत मिळते. रूढ समजुतीप्रमाणे हेमंताची अखेर या महिन्याने होते. रामायणात 'इष्ट ऋतु' म्हणून हेमंताला गौरविले आहे. आपल्या उष्ण देशात थंडीच्या महिन्यांना, विशेषत: गव्हाची हिरवीगार सुंदर पिके शेतात डोलती ठेवणाऱ्या ह्या महिन्याला, पुष्टीचा महिना मानावे, यात काहीच नवल नाही. पावसाच्या मारझोडीत शेतातल्या डुलत्या पिकांचे सौंदर्य मनमुराद डोळ्यांत भरत नाही. चिखलाच्या डबक्यांनी माणूस व पिके यांच्यातले अंतर वाढते. पण हिवाळी पिकांचे तसे नसते. आकाश धरणीला धुक्याच्या मिषाने चहूबाजूंनी सांजसकाळ कवटाळीत असते. धुक्याचा जीवनदायी ओलावा आणि गारठा शेताशेतांतून हिरवा काटा तिच्या अंगावर फुलवीत असतो. सूर्याचे किरणही धुक्यातून आरपार जाताना धडपडतच गेलेसे वाटतात.

या दिवसांत सूर्यप्रकाशाच्या कांबी सकाळच्या वेळी धुक्याच्या पसाऱ्यातून मार्ग आक्रमीत असताना जशा स्पष्ट व रमणीय दिसतात तशा धुके ओसंडलेल्या हंगामात दिसत नाहीत. सूर्य वर आला आणि धुके विरलेसे वाटले तरी झाडाच्या मधून जे उन्हाचे कवडसे जमिनीवर वा घरांच्या छतांमधून, झरोक्यांमधून भिंतीवर पडतात, ते सारे या किरणांच्या शलाकांमधूनच पडलेले दिसतात. जणू काही हिवाळ्यात आपल्यापासून दूरदूर जाणाऱ्या धरणीला आकाशाने धुक्याने लपेटून टाकली असता आपल्या हातांनी चाचपडत चाचपडत सूर्य स्पर्शीत असतो. तिचे आकाशाच्या मिठीत दडलेले मुख प्रकाशाकडे वळवीत असतो. अगदी नाजूक सुखावह असे त्याचे किरण अनुनयाची कला कशी असावी, हे जणू काही प्रत्यक्ष दाखवीत असतात. मोठ्या रात्रीचा गारवा व विश्रांतीसुख अनुभवून तुष्ट, पुष्ट झालेली पृथ्वी आळसत आळसत सूर्यसन्मुख होत असते.

पौष महिन्याचा विचार मला आदिवासींच्या एक-दोन कथांशिवाय आता करताच येईनासा झाला आहे. पृथ्वीचा अनुनय आकाश व सूर्य दोघेही करतात. पृथ्वीचे खरे प्रेम आकाशावर पण दैवयोगाने लग्न होते सूर्याबरोबर. आकाश रडते, ते पावसाच्या रूपाने. त्याची मिठी मेघांच्या व धुक्याच्या रूपातली. पृथ्वीशी सूर्याचे मीलन सांजसकाळी होते. त्यावेळी आकाश तळमळते आणि सकाळी दहिवराचे अश्रू गाळते ! पौषातले उगवते तांबडे-लाल सौम्य सूर्यबिंब उगवताना झाडांवर कुंदाची ती पांढरीशुभ्र फुले दवाचे थेंब पाकळ्यांवर झेलून, आपल्या सुगंधाचा श्वास रोखून निश्चलपणे उभी असलेली पाहिली, की खरोखरच वरचे रूपक सार्थ झालेले वाटते आणि म्हणूनच पौषातला सूर्योदय पाहणे मला फार आवडते.

**129.** 'पृथ्वी आळसत आळसत सूर्यसन्मुख <u>होत असते</u>.' यातील अधोरेखित क्रियापद कोणते ?

(1) अकर्मक क्रियापद

(2) संयुक्त क्रियापद

(3) सहायक क्रियापद

(4) सकर्मक क्रियापद

130. 'दहिवर' शब्दाचा योग्य अर्थ कोणता?

(1) दव (2) दही (3) वृक्ष (4) मडके

131. 'आकाश धरणीला धुक्याच्या मिषाने कवटाळीत असते.' यातील अधोरेखित काय आहे?

(1) विशेषनाम (2) सामान्यनाम (3) भाववाचक नाम (4) क्रियाविशेषण

132. पृथ्वीचा अनुनय आकाश व सूर्य दोघेही करतात, यातील 'अनुनय' या शब्दाचा समानार्थ कोणता?

(1) भक्ती (2) अनुकरण (3) प्रियाराधन (4) विवाह

133. पौष महिन्याला संक्रमणाचा महिना म्हणण्याचे कारण ________.

(1) दिवस मोठा होतो (2) हिरवीगार पिके येतात

(3) आकाशात धुके असते (4) धुक्यातून सूर्यकिरणे येतात

134. पुढीलपैकी सामान्यनाम कोणते?

(1) धुके (2) गारठा (3) माणूस (4) ओलावा

135. पृथ्वी, आकाश आणि सूर्य यांच्या प्रेमकथेचे रूपक लेखिकेला कशामुळे उलगडले?

(1) पौषाची संक्रमणता (2) पृथ्वी व सूर्याचे मीलन

(3) आदिवासी कथा (4) रामायण

136. पुढीलपैकी कोणते माध्यम समकालिक (Synchronous) आणि अ-समकालिक (Asynchronous) ऑनलाईन शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध करून देते?

(1) पाठ्यपुस्तक (2) रेल्वे तिकिट

(3) दूरदर्शन (Television) (4) पॅडलेट (Padlet)

137. संस्कारक्षम मूल्यमापन (Formative assessment) या बाबतीत कोणते तंत्र आदर्श नाही?

(1) स्वाध्याय (assignment) (2) कागद पेन्सिल चाचणी

(3) प्रकल्प (4) वर्ग सादरीकरण

**138.** दैनंदीन वस्तूंचा वापर करून केलेले भाषा शिक्षण म्हणजे _________.

(1) रेलिया (Relia) (2) भाषा-खेळ (3) शिक्षण साधन (4) मजकूर

**139.** भारताचे शिक्षणात भाषा धोरण (त्रिभाषा सूत्र) पुढीलपैकी कशाला उत्तेजन देते ?

(1) बहुभाषिक शिक्षण
(2) एकभाषिक शिक्षण
(3) हिन्दीवर भर देत द्वैभाषिक शिक्षण
(4) मातृभाषाधारित बहुभाषिकत्त्व

**140.** अधोगामी (Top-down) प्रक्रियेशी संबंधित नसलेला पर्याय कोणता ?

(1) ऐकणारे त्याच्या पार्श्वभूमीच्या ज्ञानावर अवलंबून असतात.
(2) ऐकणारे उद्दिष्ट अर्थाचा अनुमान लावतात.
(3) ऐकणारे जगाच्या बाबतीतल्या ज्ञानाचा वापर करतात.
(4) ऐकणाऱ्यांना प्रत्येक शब्द समजणे गरजेचे आहे.

**141.** 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' कधी साजरा केला जातो ?

(1) 1 जानेवारी (2) 14 फेब्रुवारी (3) 21 फेब्रुवारी (4) 13 एप्रिल

**142.** तुम्ही तुमचा सहकारी जो तुमचा मित्र ही आहे त्याला इमेल लिहिता. या प्रकारचा इमेल म्हणजे __________.

(1) अनौपचारिक (2) औपचारिक (3) व्यावसायिक (4) पत्र व्यवहार

**143.** विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आणि आकलनात स्पष्टता येण्यासाठी समग्र अध्ययन-अध्यापन पद्धतीत केलेले मूल्यमापन म्हणजे __________.

(1) शिक्षणासाठी मूल्यमापन
(2) शिक्षणाचे मूल्यमापन
(3) शिक्षणात मूल्यमापन
(4) शिक्षण म्हणजे मूल्यमापन

**144.** द्वितीय भाषा वर्गामध्ये शिक्षक 'आरोग्य म्हणजेच संपत्ती' यावरील ध्वनिफीत लावतात. यानंतर ते मुलांना पत्रके वाटतात व त्यातील दिलेल्या पर्यायांपैकी अचूक उत्तर देण्यास सांगतात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कोणत्या बाबतीत सक्षम करायचे आहे ?

(1) आरोग्यावरील पाठ ऐकणे
(2) विद्यार्थ्यांना नियत कार्यात गुंतवून ठेवणे
(3) आशयाचे विश्लेषण करण्यास ऐकणे
(4) 'आरोग्य आणि संपत्ती' यावरील धडा पाठ करणे

**145.** 'भाषा शिक्षणात चुका' या संदर्भात कोणते विधान योग्य नाही ?

(1) चुका भाषा शिक्षण प्रक्रियेत अडथळा आणतात.

(2) चुका प्रत्येक वेळेला वाईट नसतात, शिक्षणात मदत करतात.

(3) चुका हा भाषा शिक्षण प्रक्रियेचा महत्त्वाचा पैलू आहे.

(4) चुका द्वितीय भाषा आत्मसात करण्याच्या प्रक्रियेला समजून घेण्यात मदत करतात.

**146.** भाषा शिक्षणात सर्जनशीलता म्हणजे _________.

(1) वर्गातील मुक्त नियतकार्य ज्यात विविध अर्थ लावण्याचे नि उत्तर देण्याचे स्वातंत्र्य असणे

(2) एखादी गोष्ट समजून घेण्यासाठी विविध विषयांच्या घटकांना सामावून घेणे

(3) नवीन शिक्षण पद्धतींचा वापर करून केलेले वर्ग-कार्य

(4) संभाषणात्मक भाषा शिक्षणाच्या मदतीने केलेली वर्ग सामग्री

**147.** विद्यार्थ्यांना भाषेच्या संपर्कात आणले पाहिजे. चुका होणे हे याचे प्रमाण आहे की अध्ययन होत आहे. या मान्यतेचा पुरस्कार कोण करते ?

(1) वर्तनवादी (Behaviourist) (2) बोधनात्मकवादी (Cognitivist)

(3) मानवतावादी (Humanist) (4) मानसविश्लेषणवादी (Psychoanalyst)

**148.** पुढीलपैकी कोणते विधान अचूक आहे ?

(a) डिस्लेक्सिया (Dyslexia) ही वाचन अक्षमता आहे.

(b) डिस्ग्राफिया (Dysgraphia) ही लेखन अक्षमता आहे.

(c) डिस्ग्राफिया (Dysgraphia) ही वाचन अक्षमता आहे.

(d) डिस्लेक्सिया (Dyslexia) ही लेखन अक्षमता आहे.

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) आणि (d) बरोबर

(3) (a) आणि (b) दोन्ही बरोबर (4) (c) आणि (d) दोन्ही बरोबर

149. शासकीय शाळेची शिक्षिका, रीटा, दृष्य साधने आणि भाषा–खेळांचा वापर इयत्ता सातवीच्या मुलांना इंग्रजी शिकवण्यासाठी करते. रीटा कोणत्या अध्यापन सिद्धांताचा वापर करते ?

(1) नैसर्गिक प्रक्रियेचा सिद्धांत
(2) सरावातून सवय लावणे सिद्धांत
(3) प्रेरणा आणि आवड सिद्धांत
(4) जीवनाशी संबंध लावणे सिद्धांत

150. प्राणी हा मुख्य पात्र असलेली आणि सुगमपणे नीती शिकवण देणारी कथा म्हणजे ___________.

(1) कल्पित कथा
(2) बोधकथा
(3) विज्ञानकथा
(4) यात्रावृत्तांत

- o O o -

SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***